संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# हुंडा घेणाऱ्या खंडणीखोरांची नाकेबंदी हवी

**प्रगतीशील** महाराष्ट्र किंबहुना महिला शिक्षण देशातलं पहिलं महिला धोरण, सती प्रथा, पुनर्विवाह अशा अनेकानेक महिला विषयक सुधारणांसाठी महाराष्ट्राचं नाव घेतलं जातं. ज्या काळामध्ये महिलांना शिक्षणही नाकारलं जात होतं. निरक्षरता होती. अनेक प्रकारच्या अंधश्रद्धा आणि परंपरांचा पगडा होता. अशा काळात महिलांवर होणाऱ्या अत्याचाराचे प्रमाण मोठे असायचे नुकताच आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा झाला. त्यात महाराष्ट्रातील महिलांचा सन्मान आणि त्यांच्या सक्षमीकरणाविषयी शासकीय स्तरावरून ग्वाही दिली गेली. वेगवेगळ्या योजनांचाही पाढा वाचला गेला. म्हणजेच महिलांविषयक अधिकाधिक सकारात्मक दृष्टीकोन आणि सक्षमीकरणाच्या योजना राबवल्या जात असतानादेखील हुंडाबळीसारखा अत्यंत कृतघ्न प्रकार महाराष्ट्राच्या मानगुटीवर अजूनही कायम आहे. विधानसभेतच विचारण्यात आलेल्या एका लक्ष्यवेधीच्या माध्यमातून शासनातर्फे जी अधिकृत आकडेवारी दिली गेली ती धक्कादायकच म्हणावी लागते. गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्रात हुंडाबळीचे ७९९ म्हणजे जवळपास ८०० गुन्हे नोंदवले गेले. याशिवाय असे अनेक हुंडाबळीचे प्रकार असतील की, त्यांची पोलीस दप्तरी नोंद झाली नसेल. अशा अदृश्य हुंडाबळीच्या प्रकारांचा विचार केला तर गेल्या पाच वर्षांत हजारापेक्षा जास्त हुंडाबळी झाले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. कायद्याने हुंडा द्यायला घ्यायला बंदी असताना जर हे प्रकार घडत असतील तर कायदा कुचकामी ठरला हे वेगळे सांगायची गरज नाही. परंतु असे प्रकार रोखण्याकरीता अधिक कठोर कायदा करण्याची आवश्यकतादेखील सरकारला वाटलेली नाही हीदेखील वस्तुस्थिती आहे. प्रत्यक्ष लग्न ठरवले जात असताना किंवा लग्नसमारंभांमध्ये अधिकृतपणे किंवा सगळ्यांसमोर हुंड्याची देवाणघेवाण होत नसेल. मात्र छुप्या पद्धतीने वरपक्षाची मर्जी राखण्याकरीता हुंड्याच्या स्वरुपात वेगवेगळ्या किमती वस्तू देण्याचा प्रकार सुरू राहतो. खरे तर कोणत्याही माध्यमातून किंवा प्रकारातून वधू पक्षाकडून घेतला जाणारा हुंडा म्हणजे नातं टिकवण्यासाठी मागितलेली खंडणीच ठरते. म्हणजेच खंडणी वसूल करणाऱ्या गुन्हेगारांना जसा कडक कायदा लावला जातो. तसा या हुंडा नावाच्या खंडणीखोरांना कडक कायदे लावले गेले पाहिजेत.

### प्रमाण कमी तरी चिंताजनक

साधारणपणे २०२०-२१ पासून महाराष्ट्रात दरवर्षी सरासरी सव्वा ते दीडशे हुंडाबळीत गेल्याचे स्पष्ट होते. २०२१ ला हे प्रमाण १७२ होते. २०२५ ला ते १२८ पर्यंत खाली आले. २०२२ ला तर हे प्रमाण १८० पर्यंत पोहोचले होते. पाच वर्षांत हुंडाबळीचे प्रमाण कमी कमी होत गेल्याचे दिसून येते. परंतु ते कमी होण्याची गती अतिशय संथ किंवा मंद आहे. आजही हुंडाबळीचे शंभराहून गुन्हे घडत असतील तर महाराष्ट्रासारख्या सुसंस्कृत आणि वैचारिकदृष्ट्यादेखील परिपक्व असलेल्या राज्यासाठी तो कलंक ठरतो. अर्थातच केवळ कायद्याने ही प्रथा पूर्णपणे बंद होणार नाही. यासाठी तितक्याच मोठ्या सामाजिक जागृतीची आवश्यकता आहे. ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात हीच जागृती आलेली पाहायला मिळते. हुंड्याच्या स्वरूपात रोख रक्कम तर दिली जात नाहीच. उलट लग्नाचा खर्च वधू आणि वर पक्ष निम्म्याने वाटून घेतो. मात्र ग्रामीण किंवा आदिवासी भागात वेगवेगळ्या जाती संप्रदायांमध्ये पूर्वापार चालत आलेल्या या परंपरांचा पगडा पाहायला मिळतो. मुलगा जास्त शिकलेला असेल तितक्या अधिकाधिक प्रमाणात त्याला वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तू देऊन खूश करण्याचा प्रयत्न केला जातो. अनेकवेळेला खेड्यापाड्यांमधली प्रतिष्ठित कुटुंब किंवा त्यांचा मानमरातब पाहून लग्न ठरवले जाते आणि त्या प्रतिष्ठेला शोभेल अशा प्रकारचा घसघशीत खर्चही केला जातो. हुंड्याच्याऐवजी आहेराच्या स्वरूपात अगदी मध्यमवर्गीय कुटुंबसुद्धा पाच-पाच, दहा-दहा लाख रुपयांचा खर्च करत असतो. दुर्दैवाचा भाग असा आहे की, लग्नानंतर पैसा किंवा वस्तूंसाठी हपापलेली वराकडची मंडळी अस्वस्थ राहतात. आणि लग्नानंतर मुलीकडे अधिकाधिक वस्तू मिळवण्याचा तगादा लावतात. आपल्या वडिलांची आर्थिक परिस्थिती आणि एकूण परिस्थिती लक्षात घेऊन मुलीकडून जेव्हा सासरच्या मंडळींना नकार दिला जातो तेव्हा तिचा छळ सुरू करून सासरी आल्यानंतर माहेरी कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये या एकाच भावनेपोटी ती विवाहित मुलगी सर्व प्रकारचा जाच किंवा अत्याचारही सहन करीत राहते. जेव्हा या सगळ्या अत्याचाराचा कडेलोट होतो त्यावेळेला तिचा बळी जातो.

### अधिक उपाययोजनांची गरज

सरकारने विधानसभेत विचारलेल्या लक्ष्यवेधीवर उत्तर देताना दिलेली आकडेवारी हा केवळ सरकारी उपचार ठरू नये. राज्यातल्या कोणत्याही विवाहित महिलेला कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही यासाठी अधिक नवनवीन उपक्रम किंवा संकल्पना राबवण्याची आवश्यकता आहे. छळ होत असलेल्या महिला तक्रार करण्यासाठी पुढे येतीलच असे नाही. परंतु आजच्या तंत्रज्ञान युगाचा विचार करता दिला जाणाऱ्या त्रासाची काही क्षणात माहिती मिळू शकते. वेगवेगळ्या स्वयंसेवी संस्थांच्या मदतीतून हे प्रकार रोखण्यासाठी जनजागृतीची मोहिमही राबवता येऊ शकते. दरवर्षी शंभरावर महिलांना सासरच्या या जाचाला कंटाळून जीव संपवावा लागतो, ही महाराष्ट्रासाठी खूप मोठी शोकांतिका ठरते. हुंडा नावाच्या या खंडणीचा अजूनही सुरू असलेला हा हैदोस संपुष्टात आणण्याकरीता कडक कायद्यांबरोबरच कौटुंबिक स्तरावरच्या जनजागृतीची आणि सहाय्यता केंद्रांचीदेखील आवश्यकता आहे. आज महिलांच्या साक्षरतेत मोठी वाढ झालेली आहे. परंतु अगदी उच्चशिक्षित महिलांच्याबाबतीतही हे प्रकार घडून येतात. दोनच दिवसांपूर्वी नाशिकला एका डॉक्टर महिलेने केलेली आत्महत्या हे त्याचे ताजे उदाहरण ठरते. तो प्रकार हुंडाबळी किंवा अत्याचाराचा भाग नसेलही. परंतु उच्चशिक्षितांमध्ये असलेले कौटुंबिक स्तरावरचे नैराश्य तितकेच चिंताजनक ठरते. लाडक्या बहिणींचा उल्लेख वारंवार होतो, पण त्यातल्या काही बहिणींवर अशी वेळ येत असेल तर ते आणखीनच दुर्दैवी ठरते.